

# इंजिनिअर्स डे विशेष

# रोबोटिक्स तंत्रज्ञानाकडेही विद्यार्थ्यांचा ओढा

## ■ विश्व अभियंता दिन : आवडीचे क्षेत्र निवडण्याच्या नवनवीन संधी उपलब्ध

**नाशिक : देवयानी सोनार**

पूर्वी इंजिनिअर्स म्हटले की फक्त मेकॅनिकल आणि सिव्हिल हे दोनच क्षेत्र डोळ्यासमोर येत. मात्र, आता अभियांत्रिकी क्षेत्राच्या कक्षा रुंदावत आहेत. रोबो तंत्रज्ञानाबरोबरच नॅनो टेक्नोलॉजीचाही उगम होत आहे. कृषी, पर्यावरण आणि आयटी क्षेत्रात करिअरच्या नवनवीन संधी उपलब्ध होत आहे. आयटीमुळे प्रगतीचा वेग अभियांत्रिकीसाठी भविष्यकाळ निश्चितच उज्ज्वल आहे.

आज प्रत्येक क्षेत्रात इंजिनिअर्सचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. थ्री इडियट या हिंदी चित्रपटात आमीर खानचा संवाद आहे. तो म्हणतो, 'ज्यात तुम्हाला आनंद वाटतो ते काम तुम्ही करा.केवळ सर्वांनीच एकाच स्कॉलर समजल्या जाणाऱ्या शाखेकडे न जाता आवडीच्या क्षेत्रात काम केल्याचे समाधान मिळते.'

चीन आणि इतर देशात रोबोटद्वारे रुग्णांना सेवा देणे, रुग्णांसंदर्भातील,तसेच मोठमोठ्या हॉस्पिटल्समधील कामे इतर कामे करुन घेणे. आदी प्रकारच्या कामामध्ये कोरोना संकटात रोबोटिक्स तंत्रज्ञानाचा वापर करुन कोरोना प्रादुर्भावापासून दूर राहण्यात यश मिळविले. अशाच प्रकारच्या तंत्रज्ञानाची गरज, त्याअनुषंगाने तंत्रज्ञान बनविणारे, वापरणारे, माहिती असलेले इंजिनिअर्सची संख्या येत्या काळात वाढणे अपेक्षित आहे. जनसामान्यांच्या मताप्रमाणे स्कॉलर आणि आर्थिक सुबत्ता देणारा डॉक्टर्स,इंजिनिअर्स,वकील याच पद आणि नोकरीभोवती मूल्यांकन केले गेले आहे. आज निकालाचा टक्का वाढलेला आहे.सर्वांनाच वाटते इंजिनिअर व्हावे.परंतु त्यासाठीचे मुळात आवड,कौशल्य,बुद्धिमत्तेची गरज भासते.सर्व क्षेत्रात स्पर्धात्मक परिस्थिती असतांना आई-वडिलांच्या इच्छेखातर इंजिनिअर क्षेत्राकडे जाणारे विद्यार्थी आहेत. परंतु आता परिस्थिती बदलत आहे. मुलांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात ज्या गोष्टींची आवड आहे. पुढे त्याचे व्यावसायिक शिक्षण घेऊन तो विद्यार्थी स्वतःचा व्यवसाय किंवा नोकरी मिळवू शकतो. इंजिनिअरिंगच्या सिव्हिल, मेकॅनिकल,केमिकल,इलेक्ट्रिकल, कॉम्प्युटर या पारंपरिक शाखांशिवाय आता रोबोटिक्स आणि आर्टिफिशीअल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, मेकॅट्रॉनिक्स अशा शाखा सुरू झाल्या आहेत. येणारा काळ या शाखांतील विद्यार्थ्यांसाठी नक्कीच उज्ज्वल असणार आहे.

१५ सप्टेंबर हा महान अभियांत्रिकी मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जन्म दिवस हा अभियंता दिवस म्हणून साजरा केला जातो. ते एक महान इंजिनिअर होते. त्यांना १९५५ मध्ये भारतरत्न मिळाले. ज्या इंजिनिअर्सने देशाच्या उन्नतीसाठी मोलाचे योगदान केले त्यांचा सन्मान करणे आणि नवीन तरुणांना या क्षेत्राकडे जाण्यासाठी प्रेरित करणे, या उदात्त हेतूने हा दिवस साजरा केला जातो.



पुढचा काळ इंजिनिअर्सला खूप आव्हानात्मक असणार आहे. कोविडनंतर ज्या पायाभूत सुविधा करण्यात येतील. सर्वसामान्य स्थिती परत सुरू होईल त्यावेळी अर्थव्यवस्था आणि पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी अभियंत्यांची भूमिका मुख्य राहणार आहे.या क्षेत्राकडे कल कमी झाला आहे. मेकॅनिकल,सिव्हिल, इलेक्ट्रिकल, कॉम्प्युटर, रोबोटिक्स. आर्टिफिशीअल इंटेलिजेंस,मशीन लर्नींग,मेकॅट्रॉनिक्स सारख्या कोर्सेचा जरूर विचार करावा.

**प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर,** के.के. वाघ कॉलेज.



आज बाहेरील परिस्थिती अभियांत्रिकीसाठी पूरक नसली तरी वेळ बदलत असते हे लक्षात घेऊन आपल्या आवडीच्या अभियांत्रिकी शाखेत चांगले ज्ञान संपादन करावे. आपल्याला त्या क्षेत्रात काम करायला आवडेल का हा विचार करून शाखा निवडावी.

**निकिता हेमने,**
सहाय्यक कार्यकारी, अभियंता


Rajesh Dargode
Director



R. D. DATA SYSTEMS
315, Dargode Sadan,
Opp. Pethe High School,
Raviwar Peth, Nashik - 422 001
Tel : 0253-318221, 2315640,
6634921, Telefax : 2577225
Mobile : 9422252621, 9373761121
E-mail : sales@rddatasystems.com
URL : www.rddatasystems.com
Computer Dealer





**15-09-2020,**
**Gavakari**

लोकमत

## नवीन संधी : धोरण, युवकांची मानसिकता बदलण्याची गरज

# आत्मनिर्भर होण्यासाठी अभियंते कटिबद्ध

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : देशात युवा पिढी मोठ्या प्रमाणात आहे. त्यातही अभियंता म्हणजे सृजनशीलता. पंतप्रधानांनी आत्मनिर्भर भारताची हाक दिली असली तरी देशाला आत्मनिर्भर

**जागतिक अभियंता दिन**



“आत्मनिर्भरतेसाठी अभियंता या संकल्पनेत शासकीय आणि वैयक्तिक पातळीवर आव्हाने आहेत. यात शासकीय पातळीवर शून्य विलंब धोरण, पारदर्शी आणि भ्रष्टाचाररहित कारभार आवश्यक आहे. देशातील युवा अभियंते हे अन्य देशात का जातात, याची कारणे शोधून त्यानुसार अभियंत्यांना कौशल्य विकासाची संधी मिळावी असे वातावरण सरकारी पातळीवर झाले पाहिजे. अलीकडे युवा अभियंत्यांची योगदान देण्याची पुरेशी तयारी नसते. स्पेसिफिकेशननुसार काम न करण्याची प्रवृत्ती बळावत आहे. त्यामुळे गुणवत्तेवर परिणाम होता.

**- प्रा. सुनील कुटे,** के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय



“आत्मनिर्भर होणे ही काळाची गरज आहे. केवळ पंतप्रधान म्हटले म्हणून नव्हे तर देशात आणि महाराष्ट्रात उद्यमशीलता रुजली पाहिजे. सध्याची स्थिती ही आत्मनिर्भर होण्यासाठी फार योग्य आहे. विशेषत: भारत -चीन ताणलेले संबंध आणि नंतर लॉकडाऊनमुळे विदेशात न गेलेले अभियंते आणि देशाचे धोरण म्हणून पोषक वातावरण अत्यंत प्रेरणादायी आहे. त्याचा लाभ घेतला पाहिजे. विशेषत: उत्पादन क्षेत्रासाठी या सर्व पोषक वातावरणाचा लाभ घेतला पाहिजे. स्टार्टअपसाठी ही सर्वत्तिम वेळ असून, त्यामुळे भारत आत्मनिर्भर होऊ शकेल.

**- अपूर्वा जाखडी,** स्पेस एज्युकेटर

म्हणजेच स्वावलंबी करण्यासाठी अभियंताच योगदान देऊ शकतात. तथापि, त्यासाठी शासकीय धोरणात बदल हवे, लवचीकता हवी त्याच पद्धतीने युवा अभियंत्याचीदेखील मानसिकता हवी, असे मत या क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केले. सर विश्वेशरय्या यांची जयंती अभियंता दिन म्हणून साजरी केली जाते.

अभियंत्याची देशपातळीवर संस्था असलेल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स असोसिएशन दरवर्षी एक ब्रीदवाक्य घेऊन काम करीत असते. यंदा या संस्थेने इंजिनिअर्स फॉर सेल्फ रिलायंट इंडिया असे ब्रीद दिले आहे. कोरोनासंकटामुळे यंदा याच नव्हे तर विविध पातळीवर अभियंता दिनाचे सोहळे होणार नसले तरी या ब्रिदाच्या निमित्ताने देशाच्या स्वावलंबित्यासाठी अभियंत्यांचे योगदान महत्त्वाचेच आहे, हे अधोरेखित होते.

देशात अभियांत्रिकीचे शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था असून, हजारो अभियंते दरवर्षी या महाविद्यालयात शिक्षण घेऊन बाहेर पडतात. मात्र त्यांचा राष्ट उभारणीसाठी उपयोग झाला पाहिजे. अनेक कुशल अभियंते पदवी घेतल्यानंतर देशात थांबण्यापेक्षा विदेशात जाणे पसंत करतात. हे ब्रेन ड्रेन रोखायचे असेल तर ते देशात का थांबण्यास तयार नाही याचा शोध घेतला पाहिजे आणि त्यांना पोषक वातावरण निर्माण झाले पाहिजे. सध्या स्टार्टअपसारख्या अनेक नवीन संधी उपलब्ध होत आहे हे स्वागतार्ह आहे. त्याचा वापर युवा अभियंत्यांनी करुन घ्यावा असेही मत जाणकारांनी व्यक्त केले.

Nashik, Nashik-Today
15/09/2020 Page No. 4

सकाळ

# विधायक बदलांसाठी अभियांत्रिकी



**एका ठिकाणी अस्तित्वात असलेली नदी दुसऱ्या ठिकाणी तशीच राहत नाही. वेळ व जागा बदलताच नदीही बदलत जाते. अभियांत्रिकीचेही तसेच आहे. मानवाची जसजशी उत्क्रांती होत गेली, तसतसे अभियांत्रिकी क्षेत्रही काळानुरूप बदलत गेले. किंबहुना 'बदल' हेच अभियांत्रिकीचे अवच्छेदक लक्षण आहे.**

**डॉ. सुनील कुटे,**
अधिष्ठाता, के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था

कोणताही बदल विधायक किंवा विध्वंसक असतो. अभियांत्रिकीचा उपयोग यापैकी कशासाठी करायचा, हे मानवाच्या विवेकावर अवलंबून आहे. जगाची विस्मयकारक प्रगती ज्या अभियांत्रिकी क्षेत्रामुळे आपण आज पाहत आहोत, त्याच अभियांत्रिकीच्या अणूबॉंबने दुसऱ्या महायुद्धात भीषण नरसंहार झालेला आपण अनुभवला. त्यामुळे अभियांत्रिकी व बदल याविषयी जगात कधी नव्हे, तो गंभीर विचार करण्याची वेळ आली आहे. अभियांत्रिकीमुळे विकसित झालेले अणूबॉंब, जैविक अस्त्रे, संगणकातील व्हायरस, उपग्रहांचे अवकाशातील हल्ले, जनुकांमधील अमानवी व अनैतिक बदल आदी संशोधने मानवतेसाठी कलंक आहेत. हा विध्वंसक बदल एकीकडे दिसत असताना त्याच अभियांत्रिकी क्षेत्राने कर्करोगासारखा दुर्धर आजार बरा करण्यासाठी केलेले संशोधन, नैसर्गिक ऊर्जास्रोतांना पर्यायी ठरू शकेल, अशा संसाधनांची निर्मिती, मानवी जीवन सुखकारक बनविण्यासाठी निर्माण केलेली साधने, आधुनिक तंत्रज्ञानाने मानवतेसाठी बनविलेल्या सुविधा व साऱ्यांमुळे घडवून आणलेले बदलही वाखाणण्याजोगे आहेत.

एकीकडे उद्ध्वस्त होत असलेली समाजव्यवस्था, बिघडत चाललेले परस्पर संबंध, आर्थिक व सामाजिक विषमतेची रुंदावत चाललेली दरी व यादिशेने होत असलेले बदल पाहता अभियांत्रिकी क्षेत्राला विध्वंसकतेकडून विधायकतेकडे नेणारे बदल घडवून आणण्याची मोठी भूमिका पार पाडावी लागणार आहे. मानवी विवेक, भावना वा मानवता यांना उत्क्रांत करणारे विधायक बदल घडविणे व त्यातून देशात नवनिर्माण करणे यासाठी अभियांत्रिकी क्षेत्राला मोठे योगदान देण्याची संधी आज जगभर खुणावत आहे.

Nashik, Nashik-Today
15/09/2020 Page No. 4